**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 03-12-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये मौदा ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-12-03 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-12-04 | 2024-12-05 | 2024-12-06 | 2024-12-07 | 2024-12-08 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.1 | 0 | 0 | 0 | 0.2 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.1 | 30.8 | 30.9 | 30.8 | 30.2 |
| किमान तापमान (अं.से) | 20.9 | 20.7 | 19.6 | 19.1 | 19.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 81.4 | 65.2 | 58.4 | 59.6 | 58.7 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 41.1 | 33.7 | 29.1 | 29.6 | 35.4 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8.1 | 9.8 | 8.3 | 7.7 | 6 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 45 | 36 | 34.4 | 48.8 | 65 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 5 | 3 | 1 | 3 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, तालुक्यात, पुढील पाच दिवस दिनांक ०४ ते ०८ डिसेंबर २०२४ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • पुढील ५ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता, • विदर्भामध्ये पुढील २ दिवसामध्ये किमान तापमानात फारसा बदल होणार नाही त्यांनतर २ ते ४ अंश सेल्सिअस ने घट होईल तर पुढील ५ दिवसामध्ये कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

• कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे, कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकामध्ये खते कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावी. • कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील धान व इतर पिकांची कापणी व मळणी. बाजारायोग्य फळे व भाजीपाला पिकाची काढणी तसेच कापूस वेचणी ची कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावी. • कोरडवाहू रब्बी ज्वारी, करडई,

| |
|---|
| सुर्यफुल आणि हरभरा पिकात डवरणी करून जमीन भुसभुशीत ठेवावी. • कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करून कोरड्या जागेत कापूस साठवावा. |

### संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| हरभरा पिकास पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच फुलोरा अवस्थेत द्यावे. |

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | • हरभरा पिकास पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच फुलोरा अवस्थेत द्यावे. |
| मोहरी | • मोहरी पिकास पेरणीनंतर २५ ते ३० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. पेरणीपासून २० व ४ दिवसानंतर २ निंदन व डवरणी करून कराव्यात. |
| गहू | • गहू पिकास पेरणीनंतर १८-२० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेमध्ये पहिले पाणी आणि दुसरे पाणी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसानंतर जास्तीत जास्त फुटवे फुटण्याच्या अवस्थेत द्यावे. • बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे. बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी. • अरुंद पानाच्या तनाच्या व्यवस्थापनासाठी 2-4-D (सोडियम साल्ट) या तन नाशकाची प्रति हेक्टरी १ किलो क्रियाशील मूलद्रव्य ५०० लिटर पाण्यात मिसलून पेरनीनंतर २५ ते ३० दिवसानी फवारणी करावी. गहू: गहू पिकातील रुँद पानाच्या तनाच्या व्यवस्थापनासाठी अलग्रीप (मेटासल्फ्यूरोन मेथाइल) या तन नाशकाची प्रति हेक्टरी ४ ग्राम क्रियाशील घटक किंवा २० ग्राम औषधाची ५०० लिटर पाण्यात मिसलून पेरनीनंतर २५ ते ३० दिवसानी फवारणी करावी. • गहू पिकास मर्यादित सिंचनाची उपलब्धता लक्षात ठेऊन, एकाच ओलिताची व्यवस्था असल्यास पेरणीनंतर ४२ दिवसांनी, दोन ओलिताची व्यवस्था असल्यास २१ व ६५ दिवसांनी व तीन ओलिताची व्यवस्था असल्यास २१, ४२आणि ६५ दिवसांनी ओलीत करावे. |
| तूर | • तूर पिकास फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत अवस्थेत १ किंवा २ संरक्षित ओलीत करावे. • तूर पिकावरील पाने पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंग माशी आणि पाने गुंडाळणारी मारुका अळी च्या व्यवस्थापनासाठी • प्रति हेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावे. त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खाऊन फस्त करतात. • पहिली फवारणी (५० टक्के फुलोरावर असतांना) निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अॅझाडीरक्टीन ३०० पीपीएम ५० मि.ली. किवा अॅझाडीरेक्टीन १५० पीपीएम २५ मि.ली. किंवा एच.ए.एन.पी.व्ही. (१x१०' पिओबी/मिली) ५०० एल.ई/हे. किंवा बॅसिलस थुरेन्जेनेसीस १५ मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इमामेक्टीन बेन्झोट ५ टक्के ३ एस.जी. ग्रॅम किंवा लॅबडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा क्लोरेंट्रनिलिप्रोल १८.५ टक्के एस.सी. प्रवाही २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, अळ्यांचा प्रादुभांव मोठ्या प्रमाणात असल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे, त्यामुळे झाडावरील अळ्या पोत्यावर पाहतील त्या गोळा करून नष्ट कराव्यस्त. • पाने |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | गुंडाळणारी मारुका अळी च्या नियंत्रणासाठी फ्लूबेंडामाईड २० डब्ल्यूजी ६ ग्राम किंवा नोवालुरोन ५.२५ + इंडोक्झाकार्ब ४.५० % एससी १६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | • कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. • कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करून कोरड्या जागेत कापूस साठवावा. • गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास पायरेथ्रोइड कीटकनाशके जसे कि सायपरमेथ्रीन १० % ईसी २५० मिली प्रती एकर किंवा सायपरमेथ्रीन २५ % ईसी १०० मिली प्रती एकर किंवा लाम्बडा सायहेलोथ्रीन ५ % ईसी २०० मिली प्रती एकर किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % ईसी २०० मिली प्रती एकर किंवा फेनप्रोपथ्रीन १० % ईसी ३५० मिली प्रती एकर किंवा फेनवेलरेट २० % ईसी २०० मिली प्रती एकर किंवा अल्फासायपरमेथ्रीन १० % ईसी १२० मिली प्रती एकर या प्रमाणात फवारणी करावी. |
| भात | • हवामानाचा अंदाज पाहता शेतकऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी परिपक्व झालेल्या धान पिकाची कापणी ही जमीनीलगत करावी जेणेकरुन खोडकिडीची सुप्तावस्था नष्ट होऊन उन्हाळी धान पिकात या किडीचा प्रादुर्भाव कमी होइल. • कापलेला धान पिक २ - ३ दिवस उन्हात वाळू द्यावे व वाळल्यानंतर पेंढ्या बांधून मळणीस खळ्यावर रचून ठेवावे व मळणी करावी. • काजळी / काणी / आभासमय काजळीग्रस्त लोंब्या अलगत काढुन खोल खड्ड्यात पुराव्यात किंवा जाळुन नष्ट कराव्यात जेणेकरुन हा रोग इतरत्र पसरणार नाही. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • कांदा पिकाला लागवडीनंतर जमिनीतील ओलाव्यानुसार ७-१० दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. सर्वसाधारणपणे रब्बी कांदा पिकाला १२-१५ ओलीताची गरज असते. |
| लसून | • लसून पिकास कमी पण नियमित पाणी आवश्यक आहे. उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकाच्या गरजेनुसार जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्या. साधारणपणे १२ ते १५ पाण्याच्या पाळ्या लागतात. |
| संत्रा | • या महिन्यात (मृग बहार – जुन फुलोरा) नागपुरी संत्रा व मोसंबी च्या झाडांना ठिबक किंवा दुहेरी आळे पद्धतीने ओलीत करावे. संत्रा व मोसंबीच्या एक वर्ष पर्यंतच्या झ्ड्डांना ८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ४ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ३६ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस, ८ वर्ष वयापर्यंतच्या |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | झाडांना ८५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस आणि १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना १०५ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. लिम्बुच्या १ वर्ष वयाच्या झाडांना ४ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस तर १० ते २५ वर्ष वयापर्यंतच्या झाडांना ८८ लिटर पाणी प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. आंबिया बहराच्या फळ काढणीस उशीर होत असल्यास १५ दिवसाच्या अंतराने जिबरेलिक आम्ल १५ पीपीएम + १ % युरिया याची दोनदा फवारणी करावी. तन व्यवस्थापन करून बाग स्वच्छ ठेवावी. झाडाच्या बुन्ध्याजावालाची जमीन भुसभुशीत करावी. एक वर्ष वयाच्या झाडांना १०८ ग्राम युरिया आणि ४५ ग्राम म्युरेट ऑफ पोटाश द्यावे. दोन वर्ष वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्ष वयाच्या झाडांना तिप्पट तर चार वर्ष वयाच्या झाडांना चौपट खताची मात्रा द्यावी. खते देतांना नेहमी जमीन हि वाफसा अवस्थेत असल्याची काळजी घ्यावी जेणेकरून पिकास दिलेल्या खताची बचत होईल. बहार असलेल्या फळ बागेतील झाडांना ५०० ग्राम युरिया, ६०० ग्राम सिंगल सुपर फॉस्फेट, १५० ग्राम म्युरेट ऑफ पोटाश, १०० ग्राम फेरस सल्फेट, १०० ग्राम मँगनीज सल्फेट, १०० ग्राम झिंक सल्फेट आणि ५० ग्राम बोराक्स प्रत्येक झाडांना द्यावे. • आंबिया बहार घेण्यासाठी ओलीत थांबवून पाण्याचा ताण द्यावा. फळ काढणीनंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्या व त्यानंतर १ टक्के कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. माव्वा किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी या पैकी एका किटकनाशकाची आलटून पालटून १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. कोळी किडीचा प्रादुर्भाव असल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास डायकोफॉल २ मिली किंवा प्रोपारगाईट १ मिली किंवा इथिओन २ मिली किंवा पाण्यात विरघळणारे गंधक ३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने नमूद किटकनाशक बदलून दुसरी फवारणी करावी. याआधी झाडाच्या बुंध्याला बोर्डेक्स पेस्ट लावली नसल्यास लावावी. चांगल्या प्रतीचे बोर्डेक्स पेस्ट तयार करण्यासाठी एका प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात मिसळून भिजवावे, दुसऱ्या प्लास्टिकच्या बादलीमध्ये १ किलो चुना ५ लिटर पाण्यात भिजवून रात्रभर भिजवून ठेवावा. दुसऱ्या दिवशी दोन्ही बादल्यातील मिश्रण एकत्र ढवळावे. मिश्रण तयार झाल्यानंतर १२ तासाच्या आत वापरावे. फायटोप्थोरा/डिंक्या ग्रस्त झाडावरील डिंक चाकूच्या सहाय्याने खरडून घ्यावा व मेफेनोक्झाम एमझेड किंवा फॉसीटील एएल आम्लाची पेस्ट लावावी. |
| वांगे | • वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवा डेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवा स्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवा थियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी प्रती एकरी अझॉक्सिस्ट्रोबिन २३ % एससी २००-३०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्लुसिलाझोल ४० % ईसी ४०-६० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा हेक्साकोनाझोल २ % |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | एससी १२०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ % एससी २०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा टेब्युकोनाझोल २५.९ % ईसी २००-३०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा अझोक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २०० मिली प्रती २००-३०० लिटर पाणी किंवा अझोक्सिस्ट्रोबिन ११ % डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १८.३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २४०-२८० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा अझोक्सिस्ट्रोबिन १२.५% डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १२.५% डब्ल्यू/डब्ल्यू एससी ३२० मिली प्रती १५०-२०० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम २५ % + फ्लुसिलाझोल १२.५ % एसई ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा क्लोरोथॅलोनिल ४०% डब्ल्यू/डब्ल्यू + डिफेनोकोनाझोल ४% डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्ल्यूओपायम १७.७ डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १७.७ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड २५० g/I + पायरॅक्लोस्ट्रोबिन २५० g/I एससी ८०-१०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा पिकॉक्सीस्ट्रोबिन ६.७८ % + ट्रायसायक्लाझोल २०.३३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा प्रोक्लोराझ २४.४ % + टेब्युकोनाझोल १२.१ % डब्ल्यू/डब्ल्यू ईडब्ल्यू ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा टेबुकोनाझोल ६.७ % + कॅप्टन २६.९ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • टोमॅटो पिकातील अल्टरनेरीया करपा (Alternaria blight) या बुरशीजन्य रोग व्यवस्थापनासाठी प्रती एकरी मेटीराम ७० डब्ल्यूजी ८०० ग्राम प्रती २०० ते २८० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • तापमानातील घट लक्षात घेता गुरांना रात्री शेडमध्ये ठेवा आणि त्यांना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी कोरड्या जागेची व्यवस्था करावी. थंडीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी खाद्यामध्ये प्रथिने आणि खनिजांचे प्रमाण वाढवावे. प्राण्यांची ऊर्जेची गरज भागवण्यासाठी थंडीच्या काळात दररोजच्या आहारात 10 - 20 % गव्हाचे धान्य, गूळ इ. चा समावेश करावा. जनावरांना खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. कोंबड्यासाठी पोल्ट्री शेड उबदार राहण्यासाठी कृत्रिम प्रकशाची व्यवस्था करावी. |
| म्हैस | • जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा. जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी. उत्पादकता व प्रजनन वाढीच्या दृष्टीने जनावरांना दररोज ३० ते ४० ग्राम मिनरल मिक्श्चर द्यावे. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## मासेमारी निहाय सल्ला:

| मासेमारी | मासेमारी निहाय सल्ला |
|---|---|
| ताजे पाणी | • थंडी मध्ये मास्यांची पचन संस्था आकसली जाते व खाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे थंडीमध्ये खाद्याचे प्रमाण ५० ते ७५ टक्के कमी करावे हिवाळ्यामध्ये तळ्यातील वरच्या पाण्याचे तापमान कमी होते त्यामुळे मासे तळास राहणे पसंत करतात यासाठी पाण्याची पातळी सहा ते सात फूट ठेवावी. हिवाळ्यामध्ये सूर्यप्रकाशाची तीव्रता व कालावधी कमी होते व प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावल्याने पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होते यासाठी पाणी बदलून किंवा हवा सोडून पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण योग्य राखावे. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड करावी. |